# मालेगाव महानगरपालिका, मालेगाव.

## इमारत बांधकाम परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र

परवानगी नंबर : ५ जा.नं. ५ तारीख २२/५ /२०१५

अर्जदार **श्री. सौ.जयश्री शशीकांत माने,** व्दारा/- श्री. एस.व्ही.शहा, आर्कि., मालेगाव. यास
**मा.कॅम्प वॉर्ड स.नं. ३२/५अ, ३२/५ब प्लॉ.नं. ०५** मध्ये
**फायनल प्लॉ.नं.** -- नगर रचना मध्ये मालेगाव क्रं. १

आपले वरील नंबराचे जागेवरील **दुकानकेंद्र व रहिवासी , तळ +पहिला + दुसरा +स्टील्ट दुसरा मजला फक्त,**
नविन बांधकाम करणेस परवानगी /नुतनीकरण बाबत प्लॅनसह अर्ज **ता. ३/१२/२०१४** रोजी रुजू झाला. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५३ व महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ व ६९ अन्वये सोबतच्या नकाशात निळ्या रंगाने दुरुस्त केलेल्या नकाशा प्रमाणे बांधकाम परवानगी /नुतनीकरण प्रारंभप्रमाणपत्र देण्यांत येत आहे. मात्र अर्जदारास खालील अटी बंधनकारक राहतील.

१. सदर प्रमाणपत्र अर्जदारास मिळाले तारखे पासुन एक वर्षा पर्यंत वैध राहील. एका वर्षाच्या आत काही कारणास्तव बांधकाम न झाल्यास किंवा अपुर्ण राहिल्यास प्रमाणपत्राचे नतुनीकरण करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४८ अन्वये सदर परवानगी रद्द ठरेल.
२. सदर प्रमाणत्र दिल्याचे तारखे पासुन एक वर्षा पर्यंत वैध राहील. त्यानंतर प्रत्येक बारा महिन्याचे आंत नुतनीकरण केल्या नंतर तीन वर्षा पर्यंत वैध राहील व तीन वर्षानंतर रद्द समजावी.
३. सदर प्रमाणपत्र बदल करण्याचा, अट मध्ये वाढ करण्याचा व मंजुर नकाशात बदल करण्याचा हक्क महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.
४. बिनशेतीची परवानगी महसुल विभागाकडून घेतल्या शिवाय बांधकाम करु नये.
५. बांधकाम मंजुर नकाशाप्रमाणेच करावे. बांधकामात कोणत्याही प्रकारचा फेरफार पूर्व परवानगी घेतल्या शिवाय करु नये.
६. महानगरपालिकेच्या विकास नियमानुसार बांधकाम असले पाहिजे.
७. बांधकामाचा वापर फक्त **दुकानकेंद्र व रहिवासी** उपयोगासाठी करावयाचा आहे.
८. मंजुर नकाशासह सदर प्रमाणपत्र केव्हाही जागेवर उपलब्ध होईल अशी खबरदारी घ्यावी. महानगरपालिकेच्या अधिका-यांनी अथवा इतर शासकीय अधिका-यांनी मागणी केली असता त्यांना सदर कागदपत्र दाखविणे आवश्यक आहे.
९. अ) जागेवर प्रत्यक्ष बांधकाम चालु करणे पुर्वी जिल्हा निरिक्षक, भुमि अभिलेख खात्या कडून मंजुर रेखांकनाप्रमाणे मोजणी करुन घेणे आवश्यक आहे व सदरचा आखणीचा नकाशा या कार्यालयाकडे पाठविणे आवश्यक आहे.
   ब) अर्जदार यांनी सादर केलेली माहिती व जागेवरील खुणा खोटया अथवा दिशाभुल करणा-या असल्यास वा आढळल्यास सदरची परवानगी रद्द समजण्यांत येईल.
१०. जागे संबंधी अथवा बांधकामासंबंधी कोणताही वाद निर्माण झाल्यावर त्यासंबंधी सर्व जबाबदारी तुमच्यावर राहील. बांधकाम फक्त अर्जदारांच्या मालकी हद्दीतच करावे.
११. बांधकाम सुरु करणे आधी इतर सर्व संबंधीत कायद्याखाली तत्संबंधी घ्यावयाची परवानगी ही सर्वस्वी अर्जदाराची जबाबदारी तुमच्यावर राहील.
१२. महानगरपालिकेकडून जोत्याचे पुर्णत्व प्रमाणपत्र ( Plinth Completion Certificate ) घेतल्याशिवाय त्यावरील बांधकाम करता येणार नाही.
१३. भारतीय विद्युत अधिनियम व त्याखालील नियमांचे उल्लंघन होणार नाही हयाची खबरदारी घेण्याची जबाबदारी अर्जदारांवर राहील.

पान नं. २..

१४. महानगरपालिकेच्या परवानगी शिवाय सार्वजनिक रस्त्यावर बांधकामाचा माल अथवा ढिग साठवता येणार नाही. ज्यावेळी अशी परवानगी दिली जाईल त्याच वेळी नियमाप्रमाणे किंवा महानगरपालिका ठरवील त्यादराने भाडे अर्जदाराने महानगरपालिकेस द्यावयाचे आहे.

* टिप : अशी परवानगी बांधकाम पुर्ण होईपर्यंतच देण्यात येईल. बांधकामाचा माल अथवा ढिग न हलविल्याने जनतेस त्रास गैरसोय निर्माण झाल्याचे महानगरपालिकेस आढळून आल्यास महानगरपालिका अर्जदारा विरुध्द कारवाई करील व माल अथवा ढिग स्वतः महानगरपालिका हटवून घेईल व सदर कामी आलेला खर्च अर्जदाराकडून वसुल केला जाईल.

१५. प्लॉटमध्ये कमीत कमी ४ झाडे लावुन ती जतन करावीत अशी झाडे न लावल्यास वृक्ष संगोपन नियमानुसार बांधकाम पुर्णत्व प्रमाणपत्र (Completion Certificate ) देण्यात येणार नाही.

१६ इमारतीचे सांडपाणी इतरत्र सोडून सार्वजनिक आरोग्यास धोका निर्माण करु नये. सांडपाणी महानगरपालिकेच्या गटारीत सोडावे. गटार नसल्यास स्वतःच्या जागेत शोकपीट बांधून सांडपाण्याचा निचरा करण्याची सोय करावी.

१७ घरात जाणे येणे करिता महानगरपालिकेचे गटारीवर ढापा टाकावा. ढापा गटारी इतकी रुंद ३ फुट लांब व रस्त्याचे बरोबर असावा.

१८. संडासाचे बांधकाम करते वेळी १ व २ नंबराच्या टाकीवर ४ इंची व्यासाचे २ बेन्ड पाईप बसवावी त्यावर वरच्या बाजुस दोन टोप्या बसवाव्यात मात्र हे बेन्ड पाईप जवळील इमारतीचे उंचीपेक्षा ५ फुट उंच असावे.तसेच डासांची उत्पत्ती (Mosquto Free ) होणार नाही अशा प्रकारे बंदीस्त टाकी करण्यांत यावी.

१९. संडासाच्या कमीत कमी ३० फुटाच्या अंतरावर आड अगर विहिर नसावी.

२०. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६३ अन्वये सदर घराचे बांधकाम पुर्ण झाल्या पासुन एक महिन्याचे आत बांधकाम पुर्णत्व प्रमाणपत्र (Completion Certificate ) मिळणे साठी महानगरपालिकेकडे अर्ज करावा. सदर प्रमाणपत्र मिळाल्यानंतर इमारतीचा वापर सुरु करावा. परवानगी शिवाय इमारतीचा वापर केल्याचे आढळून आल्यास उपरोक्त कलमान्वये तुमच्या विरुध्द कारवाई करण्यांत येईल.

२१. I विकास परवानगी / बांधकाम मिळाल्या बरोबर भुखंड धारकाने / जमीन मालकाने / विकसन कर्त्याने संबंधीत भुखंड / जमिनीवर खालील प्रमाणे सविस्तर तपशिल असलेला फलक लावणे बंधनकारक राहील.

अ) मालक / विकसन कर्ता / वास्तु विशारद आणि कंत्राटदार यांचे नाव व पत्ता :

ब) संबंधीत भुखंडाचा सर्व्हे नंबर/ सि.स.नं. वॉर्ड : नंबर व भुखंडाचे चारही हद्दीचे सविस्तर तपशिल व क्षेत्र

क) महानगरपालिकेने मंजुरी केलेल्या परवानगीचा नंबर व दिनांक :

ड) मंजुर नकाशानुसार नमुद केलेले बांधकामाचे : अनुज्ञेय क्षेत्र

ई) एकूण रहिवासी वापरासाठीच्या सदनिकांची संख्या व वाणिज्य वापरासाठीच्या दुकानांची / गाळयांची संख्या, प्रत्येक गाळयांचे / सदनिकांचे क्षेत्रासहित :

फ) मंजुर नकाशांची प्रत पाहण्यासाठी ज्याठिकाणी उपलब्ध होऊ शकेल अशा ठिकाणचा सविस्तर पत्ता. :

II जमीन मालकाने/ विकसन कर्त्याने वरील अट क्रं. I मधील ( अ ते फ ) तपशिल कुठल्याही दोन स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करणे बंधनकारक राहील. स्थानिक वृत्तपत्रांपैकी एक वृत्तपत्र प्रादेशिक भाषेतील असावे व त्याच्या दोन प्रती कार्यालयाकडे सादर कराव्यात.

२२. नियोजित बांधकाम हे भुकंप रोधक करण्याचे दृष्टीने भारतीय मानक संस्थेने निर्देशित केलेल्या मानकानुसार बांधकाम करणे बंधनकारक राहील.

२३. बांधकामाच्या नियोजित जागेतुन विद्युत वाहिनी जात असल्यास बांधकाम करण्यापुर्वी संबंधीत खात्याकडून ती स्थलांतर करुन घेणे बंधनकारक राहील.

२४. बांधकाम नकाशावर दर्शविलेल्या नुसार जल संधारणाची व्यवस्था करणे बंधनकारक राहील.त्याशिवाय भोगवटा प्रमाणपत्र मिळणार नाही.

२५. सदर भुखंडात कमीत कमी **१२** झाडे लावुन त्यांचे जतन व संवर्धन करावे.याकामी भरलेली अनामत रक्कम तीन वर्षानंतर झाडांची स्थिती पाहून परत करण्यांत येईल. झाडाचे संबर्धन योग्य रितीने न झाल्यास अनामत रक्कम जप्त करण्यांत येईल.

२६. सदर बांधकाम परवानगी फक्त जोत्या पर्यंतच मर्यादित राहील.

२७. सदर इमारतीवर अपारंपारिक सौर ऊर्जा संयत्र बसविणे तसेच सौर ऊर्जेवर चालणारे गरम पाण्याचे सयंत्र बसविणे बंधनकारक राहील.

२८. बांधकामासाठी पिण्याचे पाण्याचा वापर करता येणार नाही. बांधकामासाठी लागणा-या पाण्याची स्वतंत्ररित्या व्यवस्था करावी लागेल.

२९. इमारतीचे बांधकाम करतांना बांधकाम साहित्यात फलाय अॅश विटा व फलाय अॅश आधारित साहित्याचा वापर करणे बंधनकारक राहील.

३०. अर्जदारांनी अर्जासोबत दिलेली माहिती खोटी अथवा दिशाभुल करणारी आढळल्यास बांधकाम परवानगी रद्द करण्यांत येईल.

३१. सदर इमारतीत अग्नीशमन व्यवस्था विकसित करुन त्यास अग्नीशमन विभागाची परवानगी घेणे बंधनकारक आहे.

आयुक्त,
मालेगाव महानगरपालिका,मालेगाव.

प्रत :

१. गृहकर विभाग, प्रभाग क्रं. १, मामनपा.
२. श्री. सौ.जयश्री शशीकांत माने, व्दारा/- श्री. एस.व्ही.शहा, आर्कि., मालेगाव.
३. म.जिल्हाधिकारी,नाशिक.
४. म.सहा.संचालक,नगर रचना,नाशिक.

Build.Permmission ४,५,६..